ठाणे, गुरुवार दि. १ ऑगस्ट २०२४ वर्ष : १३, अंक : ९४ पाने : ४, किंमत : २ रुपये
Maharashtra Samrat | Maharashtra Samrat | dainikmahasamrat@gmail.com | Reg. No. THC/58/2024-2026

वर्धापनदिन
१३ वर्षांची यशस्वी घोडदौड

सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच !®

# दैनिक महाराष्ट्र सम्राट

मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर आणि पुणे येथून प्रसिद्ध

संपादक : चंद्रकांत भोईटे

अग्रलेख

**भाजपाचा जीवघेणा विनोद आणि तथ्य**

काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे हे नुकतेच राज्यसभेत भावुक झाले असल्याचे दिसून आले. भाजपाचे खासदार घनश्याम तिवारी यांनी खरगे यांच्यावर केलेली टिप्पणी त्यांच्या जिव्हारी लागली. .......पान २ वर



**जपानच्या टोयोटाची महाराष्ट्रात मोठी गुंतवणूक**

...पान २ वर

### सर्व्हर डाऊन : ई- पॉस मशीन चालेना

# नागरिकांना रेशन दुकानांवर धान्य मिळेना

मुंबई – नागपुरात गेल्या २० तारखेपासून रेशन दुकानातील पीओएस मशीन बंद असल्याने ग्राहकांना धान्य वितरण करणं बंद झालं आहे. त्यामुळे एकीकडे ग्राहक तर दुसरीकडे दुकानदार त्रस्त झाले आहेत. दुकानदाराकडे धान्याचा स्टॉक येऊन पडलाय. मात्र त्याचं वितरण करता येत नसल्याने आणि ही अडचण केव्हा दूर होते हे माहीत नसल्याने दुकानात येणाऱ्या ग्राहकांना त्यांना वापस पाठवावं लागत आहे. तर दुसरीकडे ग्राहक मात्र धान्य घेण्यासाठी दुकानात चकरा मारत आहेत. काहींच्या घरी अन्नधान्य नसल्याचं सुद्धा ग्राहक सांगत आहेत. मात्र आता ऑफलाईन पद्धतीने वितरण करा, अशा प्रकारचे आदेश दुकानदारांना देण्यात आले आहेत. पण यातही दुकानदारांमध्ये मोठा संभ्रम आहे. कारण ऑफलाईन पद्धतीने धान्य वितरण केल्यास त्याचा रेकॉर्ड कसा ठेवायचा? हा प्रश्न असल्याने दुकानदारा समोर चिंतेचा विषय असल्याचं ते सांगत आहेत. तर ग्राहक मात्र रोज चकरामारून त्रस्त झाल्याचं सांगत आहेत.

### जुलै महिन्याचे धान्य कधी मिळणार ?

अनेक दुकानदारांना ई–पॉस मशीनच्या सर्व्हर डाऊन मुळे रेशन वाटप करताना अडचणी येत आहेत . तालुक्यात हजारो कार्डधारकांना जुलै महिन्याचे रेशन अद्याप मिळालेले नाही. त्यामुळे जुलै महिन्याचे धान्य कधी मिळणार असा सवाल कार्डधारक करत आहेत.

### रेशन कार्डाची कामे देखील होईनात :

सध्या तहसील कार्यालयात लाडकी बहीण योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्ज स्वीकारण्याची प्रक्रिया सुरू आहे .त्यामुळे रेशन कार्ड मध्ये नाव समाविष्ट करण्यासाठी किंवा स्थलांतरित करण्यासाठी महिला गर्दी करत आहेत. त्यामुळे ही प्रक्रीया देखील बंद पडली आहे.

### कार्डधारक व दुकानदारांमध्ये तक्रार :

नियोजित वेळेत धान्य वितरणासाठी दुकान उघडले जाते कार्डधारक लाभार्थी दुकान वर येतात परंतु तालुक्यात ई पॉस मशीनचा अडथका येत असल्याने कार्डधारकांना रिकाम्या हाताने परत जावे लागत आहे. शहरातील अनेक दुकानदार दुकान बंद ठेवत असल्याने कारदारक व दुकानदारकामध्ये वाद होत आहेत .

### दुकानदारांना मनस्ताप :

मागील अनेक दिवसापासून सर्व्हर पूर्णपणे बंद पडलेले असल्याने तालुक्यात धान्य वितरण व्यवस्था ठप्प झाली आहे. रास्त धान्य दुकानदारांना देण्यात आलेले इ पॉस यंत्र सर्व्हर शी कनेक्ट होत नसल्याने लाभार्थ्यांना धान्य वाटप करण्यात फार मोठी अडचण येत असल्याने दुकानदारांना सुद्धा मनस्ताप सहन करावा लागत आहे.

### वरिष्ठ कार्यालयास माहिती दिली

गेल्या काही दिवसापासून सर्व्हर डाऊन असल्याच्या तक्रारी पुरवठा विभागास प्राप्त होत आहेत. याविषयी वरिष्ठ कार्यालयास सर्व्हरच्या तांत्रिक अडचणी विषयी माहिती देण्यात आली आहे. लवकरच अडचण दूर होईल. – **राम बोरगांवकर, तहसीलदार उदगीर**



रेशनिंग दुकानदारांवर आगोदरच मोठा ताण असताना सर्व्हर डाऊनमुळे अधिकच वाढला आहे. तरी प्रशासनाने नागरिकांची अडचण लक्षात घेता लवकरात लवकर सर्व्हर ठिक करावा.

– **चंद्रकांत भोईटे, अध्यक्ष ठाणे जिल्हा व्यापारी महामंडळ**

# राज्यातील शाळांची आजपासून झाडाझडती

## विद्यार्थी गुणवत्ता विकास महाअभियान अंतर्गत मोहीम

**मुंबई : विद्यार्थ्यांच्या पाठीवरील दप्तराचे वजन कमी करण्याच्या उपाययोजनांची स्थिती, पाठ्यपुस्तकातील कोऱ्या पानांचा वापर, शाळेतील विद्यार्थ्यांची उपस्थिती कशी आहे, आनंददायी शनिवार उपक्रमाची अंमलबजावणी, शाळांची वेळ अशा विविध योजना, उपक्रमांची माहिती विद्यार्थी गुणवत्ता विकास महाअभियानांतर्गत घेतली जाणार आहे. शिक्षण विभागाकडून हे महाअभियान १ ते ३१ ऑगस्ट या कालावधीत राबवले जाणार आहे. त्यासाठी शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांना शाळांना भेट द्यावी लागणार आहे.**

या अभियानांतर्गत इयत्ता पहिली ते बारावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी राबविल्या जाणाऱ्या विविध योजना, शिक्षण विभागातर्फे दिल्या जाणाऱ्या सोयी सुविधा यासंदर्भात प्रत्यक्ष शाळात जाऊन तपासणी केली जाणार आहे. राज्याचे शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांच्या अध्यक्षतेखाली नुकत्याच झालेल्या बैठकीत यासंदर्भातील निर्णय घेण्यात आला. अभियानातील पहिल्या वीस दिवसांत प्रत्यक्ष शाळा भेटी करणे, त्यानंतर सहा दिवसात आवश्यकतेनुसार सुधारणा किंवा उपाययोजना करणे, त्यानंतर चार दिवसांमध्ये अंमलबजावणी झाली किंवा नाही, याची खात्री करणे, अशा पद्धतीने या अभियानाची कार्यदिशा निश्चित करण्यात आली आहे.

### दररोज द्यावा लागणार अहवाल

अभियानांतर्गत शिक्षण उपसंचालक, शिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी व तत्सम पदावरील अधिकारी शाळांना भेट देणार आहेत. सरल संकेतस्थळाद्वारे केंद्रप्रमुख, गट शिक्षणाधिकारी, शिक्षण अधिकारी, प्राचार्य, विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी प्रत्येक शाळा भेटीनंतर किंवा निरीक्षण केल्यानंतर त्याबाबतचा अहवाल दररोज लॉगिनद्वारे अद्ययावत करायचा आहे. शिक्षण उपसंचालकांनी जास्तीत जास्त शाळा तपासण्यासाठी अधिकारी, कर्मचाऱ्यांना उद्दिष्ट निश्चित करून द्यावे, माहिती अचूक संकलित करून विद्यार्थ्यांपर्यंत शाळांच्या विविध योजना योग्य प्रकारे पोहोचत आहेत का, याची खात्री करण्याबाबतचे निर्देश दिले आहेत.

### अभियानांतर्गत या गोष्टींची माहिती घेतली जाणार–

१) गणवेशाची उपलब्धता. २) प्रधानमंत्री पोषण शक्ती योजनेंतर्गत दिल्या जाणाऱ्या भोजनाचा दर्जा. ३) स्वयंपाकगृहाची उपलब्धता. ४) स्काऊट गाइड प्रशिक्षण व तासाचे आयोजन. ५) विविध संस्थांनी शासनासोबत केलेल्या कराराबद्दलचे अंमलबजावणी. ६) वर्गखोल्यांची स्थिती. ७) स्वच्छतागृहाची उपलब्धता. ८) अध्ययन व अध्यापन साहित्य. ९) शाळांमधील इंटरनेट सुविधा. १०) दप्तराचे ओझे कमी करण्याच्या उपाययोजनांची प्रत्यक्ष स्थिती. ११) पुस्तकातील पानांचा प्रभाव उपयोग. १२) विद्यार्थी उपस्थित व आधार नोंदणी. १३) शाळांची वेळ ठरवण्याबाबतची स्थिती.









## भारतीय रेल्वेत नोकरीला लावुन देतो अनेकांना १३.९५ लाखाचा गंडा...महाठक गजाआड

ठाणे - भारतीय रेल्वेत नौकरी लावून देण्याच्या अमिषापोटी अनेकांना गंडा घालून पोलिसांना गुंगारा देणाऱ्या आरोपी महाठक मोहित डिसोझा याला ठाणे गुन्हे शाखेच्या पथकाने खबऱ्याद्वारे माहिती मिळवून ठाणे स्टेशनवर अटक केली. फसवणुकीबाबत ठाणे नगर पोलीस ठाण्यामध्ये दाखल झालेल्या गुन्हयाच्या समांतर तपासात सदरचा आरोपी मोहित डिसोजा उर्फ ललीत शिवनाथ शक्ती(२४) याला स्टेशन परिसरातून अटक केली त्याच्या विरोधात ठाणे नगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हे शाखा युनिटीच्या जाळ्यात अडकलेला आरोपी मोहित डिसोझा उर्फ ललीत शिवनाथ शक्ती(२४) रा. रमाबाई आंबेडकरनगर, एम.आय.डी.सी. पाण्याचे टाकीजवळ, खेमाणी रोड, गुप्ता किरणा स्टोअर जवळ, श्रीराम चौक, उल्हासनगर नं. २, जिल्हा ठाणे हा नोकरीला लावण्यासाठी एका तरुणाला भेटण्यासाठी येणार असल्याची माहिती गुन्हे शाखा युनिटीच्या पथकाला मिळाली होती त्यानुसार पथकाने सापावर असून ठाणे स्थानकावर आरोपी मोहित उर्फ ललित याला अटक केली त्याच्याविरुद्ध ठाणे नगर पोलीस ठाण्यामध्ये दाखल गुन्ह्यात त्याला अटक करण्यात आल्याचे पत्रकार परिषदेत सांगितले.

### आरोपीची गुन्हा करण्याची कार्यपद्धती; रेल्वे मंत्रालयाचे बनवत पत्र देऊन करायचा वसुली

अटक आरोपी मोहित उर्फ ललित स्वतः च्या फेसबुक अकाऊंटच्या माध्यमातुन भारतीय रेल्वे मध्ये विविध पदाच्या भरतीच्या जाहिराती देवून त्यावर त्याचे नांव मोहीत डिसोझा, करण अरोरा, करण जाधव अशा विविध नावांचा वापर करुन तसेच वेगवेगळया मोबाईल नंबरचा वापर करुन सुशिक्षित बेरोजगार तरुणांना संपर्क साधुन त्यांच्याकडून त्यांचे कागदपत्रे तसेच रोख रक्कम घेत होता. तसेच त्याने तयार केलेले बनावट भारतीय रेल्वे विभागाचे काही फॉर्म त्यांना देवून ते फॉर्म भरुन घेतल्यानंतर त्यांना रेल्वे मंत्रालयाच्या नावाने बनावट नियुक्तीपत्र देवून त्यांच्याकडून पैसे स्विकारल्यानंतर स्वतःचा मोबाईल फोन बंद करुन ठेवत होता. त्यामुळे फसवणुक झालेले सुशिक्षित उमेदवार त्याच्याशी संपर्क करु शकत नव्हते.

### महाठकाने १४ तरुणांना घातला गंडा

अटक आरोपी मोहित उर्फ ललित याच्याकडे केलेल्या कौशल्यपुर्ण तपासामध्ये ठाणे, पालघर या जिल्हयातील आतापर्यंत तब्बल१४ सुशिक्षित बेरोजगारांची फसवणुक करुन त्यांच्याकडून १३ लाख ९५ हजार उकळल्याचे पोलीस तपासात समोर आले. नमुद अटक आरोपीच्या घरझडतीमध्ये देखील नोकरीस लावुन देणा-या उमेदवारांची कागदपत्रे हस्तगत झालेली

# जपानच्या टोयोटाची महाराष्ट्रात मोठी गुंतवणूक

## ■ ऑटोमोबाईल क्षेत्रात सुमारे ८ हजार रोजगार निर्मिती होणार

**जपानच्या टोयोटा किर्लोस्करनं महाराष्ट्रात मोठी गुंतवणूक केली आहे. या माध्यमातून एकट्या छत्रपती संभाजीनगर येथे तब्बल २० हजार कोटींची गुंतवणूक करण्यात आली आहे. ज्यामधून सुमारे ८ हजार रोजगार निर्मिती होणार असून मराठवाड्याच्या अर्थकारणाला त्यातून चालना मिळणार आहे. या निमित्याने देशात ऑटोमोबाईल क्षेत्रात महाराष्ट्राचा वरचष्मा कायम असल्याचे चित्र बघायला मिळाले आहे.**

**भारतातील मोटार वाहन निर्मिती उद्योगातील एक क्रांती- मुख्यमंत्री एकनाथ शिंदे**




### ऑरिक सिटीमध्ये ८५० एकरमध्ये उभारणार प्रकल्प

हा प्रकल्प ग्रीनफिल्ड असणार आहे. तर महाराष्ट्र गुंतवणुकीचे क्रमांक १चे राज्य असून सातत्याने एफडीआयमध्ये नंबर १ क्रमांकावर कायम आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे गेल्या काही महिन्यांपासून टोयोटाच्या संपर्कात होते. त्याच अनुषंगाने त्यांच्या प्रयत्नांना अखेर यश आल्याचे बोलले जात आहे. आज प्रत्यक्ष सामंजस्य करारावर स्वाक्षरी करत ही मोठी गुंतवणूक राज्यात आली आहे. नुकतेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत या प्रत्यक्ष सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यात आली आहे. ऋऑरिक सिटीमध्ये ८५० एकरमध्ये हा प्रकल्प साकारणार असल्याची माहितीही पुढे आली आहे.

**मुंबई:** आज सह्याद्री अतिथिगृह येथे मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या प्रमुख उपस्थितीत राज्य शासनाचा उद्योग विभाग आणि टोयोटा किर्लोस्कर यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. छत्रपती संभाजीनगर येथील ऑरिक सिटीमध्ये इलेक्ट्रिक आणि हायब्रीड कार्स निर्मितीच्या सामंजस्य करारावर यावेळी स्वाक्षरी करण्यात आली. छत्रपती संभाजीनगर येथे या प्रकल्पातून इलेक्ट्रिक आणि हायब्रीड कार्सचे उत्पादन होणार आहे. यासाठी २० हजार कोटींची गुंतवणूक केली जाणार असून सुमारे ८ हजार थेट आणि अप्रत्यक्ष ८ हजार अशी १६ हजार रोजगार निर्मिती होणार आहे. या प्रकल्पातून वर्षाला ४ लाख कार्सची निर्मिती होणे अपेक्षित आहे. छत्रपती संभाजीनगर येथे टोयोटा किर्लोस्करच्या प्रकल्पामुळे मराठवाड्याला मोठा फायदा तर होईलच, शिवाय एकूणच राज्य आणि भारतातील मोटार वाहन निर्मिती उद्योगात देखील एक क्रांती येईल, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यावेळी म्हणाले.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उद्योग मंत्री उदय सामंत, गृहनिर्माण मंत्री अतुल सावे, किर्लोस्कर मोटर्सच्या उपाध्यक्ष मानसी टाटा, गीतांजली किर्लोस्कर, टाटा किर्लोस्करचे व्यवस्थापकीय संचालक मसाकाझु योशीमुरा, मुख्यमंत्र्यांचे अतिरिक्त मुख्य सचिव इक्बालसिंह चहल, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव विकास खारगे,उपमुख्यमंत्र्यांचे सचिव श्रीकर परदेशी उद्योग विभागाचे प्रधान सचिव हर्षदीप कांबळे. एमआयडीसी सीईओ विपिन शर्मा यांच्या उपस्थित कार्यक्रम आज

# मंत्रीपदाच्या काळात अनेक वाईन शॉप लायसन्स विकत घेतले

**मुंबई - ठाकरेंची शिवसेना विधानसभा निवडणुकीच्या तयारीला लागली आहे. त्याचाच एक भाग म्हणून मुंबईतल्या रंगशारदा इथं बैठक पार पडली. या बैठकीत उद्धव ठाकरे चांगलेच आक्रमक झाले. मंत्रीपदाच्या काळात अनेक वाईन शॉप लायसन्स विकत घेतले असा गंभीर आरोप उद्धव ठाकरे गटाचे नेते दत्ता गोर्डे यांनी संदीपान भुमरे यांच्यावर केला आहे.**

**संदिपान भुमरेंवर गंभीर आरोप**



### मंत्रीपदाचा गैरवापर केला

**१** छत्रपती संभाजी नगरचे खासदार संदिपान भुमरे यांनी त्यांच्या मंत्रीपदाच्या काळात पदाचा गैरवापर करत सहा पेक्षा जास्त वाईन शॉप लायसन्स विकत घेतले असल्याचा आरोप उद्धव ठाकरे गटाचे नेते दत्ता गोर्डे यांनी पत्रकार परिषदेत केला आहे. नियमावलीनुसार मंत्री असताना अशा पद्धतीने कुठलाही शासकीय परवाना स्वतःचा पत्नीचा वा अपत्याच्या नावाने घेता येत नाही तर मग हे परवाने कसे घेतले? असा सवाल त्यांनी केला आहे आणि याबाबतची तक्रार त्यांनी लोकसभा अध्यक्ष आणि पंतप्रधानांना केली आहे.

**२** संदिपान भुमरे यांच्यावर कारवाई झाली नाही तर हायकोर्टात दाद मागणार असा इशाराही त्यांनी दिला आहे. सोबतच लोकसभा निवडणूक लढवत असताना प्रतिज्ञापत्रात त्यांनी त्यांचं उत्पन्न कमी दाखवलं आहे जमीन खरेदी आणि वाईन शॉप पासून मिळणारे उत्पन्न त्यांनी दाखवलं नाही हा सगळा नियम भंग आहे त्यामुळे त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी दत्ता गोर्डे यांनी केली आहे.

# दाऊदने यशश्रीची हत्या का केली?



**उरणमधील हत्या प्रकरणात धक्कादायक खुलासा**

**जुनी ओळख, लग्नाला नकार आणि हत्या दाऊदने पोलिसांनी सांगितलं हत्येचं खरं कारण**

नवी मुंबई - उरणमधील यशश्री शिंदे हत्येप्रकरणामुळे राज्यात खळबळ उडाली आहे. या हत्या प्रकरणात मोठी अपडेट सोमर आली आहे. या प्रकरणातील आरोपी दाऊद शेख याचा पोलिसांसमोर धक्कादायक खुलासा केला आहे. यशश्रीची हत्या का केली याचा कबुली जबाबच त्याने पोलिसांना दिला आहे. पनवेल न्यायालयाने आरोपीला सात दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

यशश्री शिंदे हत्ये प्रकरणी आरोपी दाऊद शेख याच्या अटकेनंतर अनेक खुलासे समोर येत आहेत. लग्न करुन कर्नाटकला चल असा तगादा दाऊद लावत होता मात्र यशश्री याला नकार देत रिस्पॉन्ड करत नसल्याने दाऊदने यशश्रीची हत्या करण्याचा निर्णय घेतला होता. हत्या करण्याच्या उद्देशानेच दाऊद शेख धारदार हत्यार घेऊन कर्नाटक वरून उरण मध्ये आला होता. इथे आल्यावर वारंवार तो यशश्री ला भेटण्यासाठी ये अशी मागणी करत होता. मात्र यशश्री याला नकार देत होती. दाऊद शेख कडे यशश्रीचे काही फोटो होते ते फोटो फेसबुक वर टाकून यशश्रीला जबरदस्ती भेटायला बोलावले होते. भेटायला आल्यावर दाऊद शेख ने सर्व फोटो डिलिट केले. भेटीच्या वेळी देखील आरोपी दाऊद हा यशश्रीकडे लग्नाचा आणि कर्नाटक मध्ये येण्याचा तगादा लावत होता, मात्र यशश्री नकार देत असल्याने त्याने तिची धारदार हत्याराने वार करत हत्या केली. हत्ये नंतर दाऊद यशश्रीचा मोबाईल आणि हत्यार घेऊन कळंबोली येथून कर्नाटकची बस पकडून गावी निघून गेला. याप्रकारणात अद्याप यशश्रीचा मोबाईल आणि हत्या केलेले हत्यार पोलिसांना सापडले नसून आरोपीज्या फोटो द्वारे ब्लॅकमेल करत होता त्या फोटोचा शोध देखील पोलीस घेत आहेत. हत्येच्या दिवशी यशस्वी ने तिच्या एका मित्राला फोन करून मदत मागितली मात्र नेटवर्क नसल्यामुळे दोघांमध्ये संभाषण होऊ शकले नाही.

### ...तर यशश्रीचा जीव वाचला असता

हे सगळं प्रकरण आता उलगडले असलं तरी ही घटना टाळता आली असती कारण हात्येच्या ५ दिवस आधीच आरोपी वर दाखल पोस्को गुन्ह्यात पनवेल न्यायालयाने दाऊद शेख विरोधात नॉन बेलेबल वॉरंट काढून त्याला लवकर अटक करण्याचे आदेश पोलीसांना दिले होते. पोलिसांनी या आदेशाचे गांभीर्याने पालन केले असते तर दाऊद ला हत्या करण्याच्या आधीच अटक करण्यात आली असती आणि यशश्रीची झालेली निर्घृण हत्या टाळता येऊ शकली असती. मात्र याबद्दल अद्यापही पोलीसाना कुठलीही कल्पना नसल्याची धक्कादायक माहिती समोर आलेय.

# संपादकीय...



**संपादक-चंद्रकांत भोईटे**

## भाजपाचा जीवघेणा विनोद आणि तथ्य

काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे हे नुकतेच राज्यसभेत भावुक झाले असल्याचे दिसून आले. भाजपाचे खासदार घनश्याम तिवारी यांनी खरगे यांच्यावर केलेली टिप्पणी त्यांच्या जिव्हारी लागली. खरगे यांचे संपूर्ण कुटुंब राजकारणात सक्रिय आहे, अशी टिप्पणी तिवारी यांनी केली होती. यानंतर खरगे यांनी सभापतींना विनंती करत तिवारी यांची घराणेशाहीवर आधारित टिप्पणी कामकाजातून काढून टाकण्यात यावी, अशी विनंती केली. यावर सभापती जगदीप धनकड म्हणाले की, तिवारी यांचे म्हणणे तपासून घेतले जाईल. त्यात जर खरगेंच्या विरोधात काही आक्षेपार्ह असेल तर नक्कीच ते विधान कामकाजातून काढून टाकू. खरगे यांनी म्हटले होते की, अशा वातावरणात मला अधिक जगण्याची इच्छा नाही. खरगे हे भावूक झाल्याचे दिसले, याचे कारण म्हणजे सत्ताधारी पक्षातील खासदार जीवघेणी व खोटारडा टीका करतात, असे खरगेना म्हणायचे होते. परंतु सत्ताधारी व विरोधकांच्या आरोप - प्रत्यारोपांत खरगेंच्या म्हणण्यातील मतितार्थ कुणालाच समजला नाही असे वाटते. राज्यसभेचे कामकाज सुरू असताना काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी तिवारी यांनी केलेल्या विधानावर आक्षेप घेतला. तिवारी यांनी खरगेंच्या राजकीय कारकिर्दीवर बोलत असताना त्यांचे संपूर्ण कुटुंब राजकारणात सक्रिय असल्याचे म्हटले होते. खरगेंनी या वक्तव्यावर आक्षेप घेतला. तसेच हे वक्तव्य घराणेशाहीचा ठपका ठेवणारे असल्याचे ते म्हणाले. खरगे पुढे म्हणाले, मी राजकारणात येणारा माझ्या कुटुंबातील पहिलाच सदस्य आहे. काँग्रेस पक्षापासून मी कामकाज करण्यास सुरुवात केली. माझे वडील वयाच्या ८५ व्या वर्षी निधन पावले. यावर सभापती धनकड म्हणाले की, तुम्हाला मोठे आयुष्य लाभो, अशी प्रार्थना करतो. सभापतींच्या या टिप्पणीला उत्तर देताना खरगे यांनी सांगितले, मला आता अशा वातावरणात अधिक जगायची इच्छा नाही. एकप्रकारे खरगे यांनी सभागृहात त्यांच्यावर टीका करणाऱयांचा निषेध नोंदवला असे दिसते. यावेळी खरगे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींवरही टीका केली. अनुराग ठाकूर यांनी राहुल गांधींवर केलेल्या टिप्पणीचा व्हिडीओ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शेअर केला आहे. हा व्हिडीओ शेअर करताना त्यावरील कॅप्शनमध्ये पंतप्रधान मोदी यांनी लिहिले की, माझ्या तरूण सहकाऱ्याने अतिशय उत्तम भाषण केले असून सर्वांनी ऐकावे. ज्यामध्ये तथ्य आणि विनोदाची योग्य सांगड घालून इंडिया आघाडीच्या राजकारणाला उघडे पाडले आहे. पंतप्रधान मोदींचा विरोध करताना खरगे म्हणाले की, पंतप्रधान मोदींना कळले पाहीजे की, कुणाचा विरोध करायचा आहे आणि कुणाबद्दल बोलायचे आहे. अशा अवमानकारक विधानाला संसदीय कामकाजात थारा देता कामा नये. अनुराग ठाकूर यांनी जाणीवपूर्वक राहुल गांधींना जातीवरून लक्ष्य केले होते. यापूर्वी राहुल गांधी यांनी आपल्या भाषणात, सगळेच मोदी चोर आहेत असे आक्षेपार्ह विधान केले होते. राहुल गांधी यांना गुजरातमधील निरव मोदी, ललित मोदींविषयी बोलायचे होते. परंतु भाजपाने राहुल यांच्या बोलण्याचा संबंध पंतप्रधान मोदींशी लावला होता. आता अनुराग ठाकूर यांनी म्हटले आहे की, ज्यांना माहीत नाही की आपली जात कोणती, ते जातगणनेची मागणी करत आहेत. असे म्हणून अनुराग ठाकूर यांनी राहुल गांधींवर जातीवरून टीका केली. राहुल गांधी बोलले तेव्हा राहुल यांना न्यायालयाने दोन वर्षे खासदारकीच्या निलंबनाची शिक्षा दिली होती. आता अनुराग ठाकूर यांनी शिक्षा होणार काय, हा मुद्दा चर्चेत येत आहे.त्यात मोदी यांनी आगीत तेल ओतावे असे वक्तव्य केले आहे की,माझ्या तरुण सहकाऱ्याने तथ्य आणि विनोदाची सांगड घालून इंडिया आघाडीचे राजकारण उघडे पाडले. मोदी अनुराग ठाकूर यांच्या विखारी टीकेला विनोद व तथ्य समजतात, हाच विनोद वाटतो. अनुराग ठाकूर यांनी जाणीवपूर्वक लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधींचा अवमान केला आणि यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उडी का घेतली? अनेक पक्षांतील नेत्यांनी आंतरधर्मीय आणि आंतरजातीय लग्न केलेली आहेत. मग त्यांच्या प्रत्येकाची जातीची छाननी केली जाईल का? असा प्रश्न उपस्थित करत खरगे यांनी संसदेत सदस्यांच्या जातीविषयी चर्चा न होण्याविषयीचे मत मांडले. खरगे यांनी अप्रत्यक्षरीत्या अनुराग ठाकूर व मोदी यांचा ठाकूर यांना पाठींबा याविषयी भाजपाला शालजोडी दिल्याचे दिसून आले. राजकारणात धर्म आणला, आता भाजपावाले जातीवर आले आहेत. त्यामुळे देशाचे भवितव्य योग्य नाही. अशा परिस्थितीत जिवंत न राहिलेले बरे असे म्हणत खरगे यांनी आपला सत्ताधाऱ्यांवरील निषेध गांधीवादी पद्धतीने नोंदवला. याबद्दल सत्ताधारी चिंतन करतील काय ?

# गणेशोत्सवासाठी कोकणात ४,३०० जादा बसेस, प्रवाशांचं ऑनलाइनही बुकिंग होणार

**२ सप्टेंबर पासून मुंबई, ठाणे, पालघर, या विभागांतील प्रमुख बसस्थानकातून या जादा बसेस सोडण्यात येणार**

मुंबई : पंढरीच्या वारीनंतर आता श्रावण महिन्याला सुरुवात होत असून सर्वांनाच गणपती बाप्पांच्या आगमनाचे वेध लागले आहेत. देशभरात, त्यात महाराष्ट्रात गणेशोत्सव (ऋपरींळ ऋशींींरश्र) मोठ्या धुमधडाक्यात साजरा केला जातो. तर, कोकणवासीयांसाठी गणेशोत्सव म्हणजे दिवाळीच. यंदाच्यावर्षी १७ सप्टेंबर २०२४ रोजी श्री गणरायाचे आगमन होत असून बाप्पाच्या स्वागतासाठी एसटी (डढ) महामंडळ सज्ज झाले आहे. मुंबईतील कोकणाच्या (घेझरप) चाकरमान्यांचा अत्यंत जिव्हाळ्याचा असलेल्या गणपती उत्सवासाठी एसटी महामंडळाने यंदा २ सप्टेंबर ते १७ सप्टेंबर दरम्यान ४३०० जादा गाड्या सोडण्याचा निर्णय घेतला आहे. व्यक्तिगत आरक्षणाबरोबरच गट आरक्षणामध्ये अमृत ज्येष्ठ नागरिकांना १०० टक्के, ज्येष्ठ नागरिकांना व महिलांना ५० टक्के तिकिट दरात सवलत दिली जात आहे.

२ सप्टेंबर पासून मुंबई, ठाणे, पालघर, या विभागांतील प्रमुख बसस्थानकातून या जादा बसेस सोडण्यात येणार आहेत. गतवर्षी ३५०० बसेस सोडण्यात आल्या होत्या. यंदा मागणी वाढल्याने त्यामध्ये ८०० बसेसची वाढ करण्यात आली आहे. गणपती उत्सव म्हणजे कोकणच्या चाकरमान्यांचा अत्यंत जिव्हाळ्याचा सण आहे. किंबहुना, गणपती बाप्पा , कोकणचा चाकरमानी व एसटी यांचे एक अतुट नाते आहे. त्यामुळे दरवर्षी गणपती उत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांच्या सेवेसाठी एसटी धावत असते. यंदा सुमारे ४३०० जादा गाड्या कोकणातील रस्त्यावर धावतील. सदर बसेस आरक्षणासाठी पीलिश्रळल.ीींलीं.ले या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आल्या असून, सदर बसेसचे आरक्षण बसस्थानकावर किंवा महामंडळाच्या चडठढउ ईी ठशीर्शीींळेप पव्दारे,उपलब्ध होणार आहे.




**२०२ विशेष ट्रेनही** गणेशोत्सवासाठी कोकणमध्ये जाणाऱ्या चाकरमान्यांचा प्रवास आता अधिक सुखाचा होणार आहे. कोकणासाठी २०२ विशेष ट्रेन सोडण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हजारो चाकरमान्यांची ही परवड थांबवण्यासाठी रेल्वे मंत्रालयाने हा निर्णय घेतला आहे. गणेशोत्सवासाठी मुंबईतून हजारो चाकरमानी कोकणमध्ये जात असतात. या काळात बस किंवा ट्रेनचे बुकिंग मिळत नाही. त्यामुळे या काळात आता अतिरिक्त २०२ विशेष ट्रेन सोडण्याचा निर्णय घेतला असून आता एसटी महामंडळानेही तब्बल ४३०० जादा बसेसे सोडण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे, कोकणवासियांना गावाकडं जाण्यासाठी आता सार्वजनिक वाहतूक सहजपणे उपलब्ध होऊ शकेल.

**नवी मुंबई महानगरपालिका**

**अभियांत्रिकी विभाग**

**निविदा सुचना क्रमांक नमुंमपा/का.अ(दिघा)./51/2024-25**

**कामाचे नाव :-** दिघा विभागातील समाजमंदिराची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे..

**अंदाजपत्रकिय रक्कम रु. :- 12,70,688/-**

**निविदा पुस्तिका ई-टेंडरिंग (E-Tendering) संगणक प्रणालीच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर व www.nmmc.gov.in या संकेतस्थळावर** दि.01/08/2024 **रोजी प्राप्त होतील.निविदेचे सादरीकरण https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर Online करण्याचे आहे. ई-निविदा ई-टेंडरिंग (E-Tendering) प्रकियेतील कोणत्याही तांत्रिक अडचणीसाठी सदर संकेतस्थळावर दिलेल्या हेल्प डेस्क नंबरवर संपर्क करावे.**

**कोणतीही निविदा स्विकारणे अथवा नाकारण्याचा अधिकार मा.आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांनी राखून ठेवलेला आहे**

सही/-
**कार्यकारी अभियंता (दिघा)**
**नवी मुंबई महानगरपालिका**

जाक्र-नमुंमपा/जसं/जाहिरात/137/2024

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, मुख्य कार्यालय,भाईंदर (प.)
ता. जि. ठाणे - ४०१ १०१, दुरध्वनी क्र. ०२२-२८१९२८२८/२८१९३०८७
Email :- pro@mbmc.gov.in
माहिती व जनसंपर्क विभाग

जा.क्र. मनपा/मावज/E- २४६४७०१/२०२४-२५ दि. ३१/०७/२०२४

**/// मुदतवाढ //**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेने दि. १३/०७/२०२४ रोजीच्या आपल महानगर, द ग्लोबल टाईम्स व महाराष्ट्र सम्राट या वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेली निविदा सुचना क्र.०४ (२०२४-२५) (2024_MBMC_1051568_1) या कामाकरीता निविदा स्विकारण्याची वेळ दि. ३०/०७/२०२४ रोजी दुपारी १.०० पर्यंत देण्यात आली होती. सदर कामाकरीता निविदा स्विकारण्याची वेळ वाढवून दि. ०६/०८/२०२४ रोजी दुपारी १.०० पर्यंत करण्यात येत आहे. तसेच सदर निविदेची तांत्रिक बिड दि. ०८/०८/२०२४ रोजी दुपारी ३.०० वाजता उघडण्यात येतील.

इतर मजकूरात बदल नाही.
जा.क्र. मनपा / मावज । E-२४६४७०१/२०२४-२५
दि. ३१/०७/२०२४

सही/-
(दिपक खांबित)
शहर अभियंता
मिरा-भाईंदर महानगरपालिका

PUBLIC NOTICE

**BEFORE THE COURT OF MEMBER MOTOR CLAIMS TRIBUNAL, THANE AT THANE**

M.A.C.P. M.A. NO. 820/2021
EXH. NO. 19

MOHMAD SHARIF BABASO ATTAR .... Applicants
V/s.
MR. DADABHAU ANANDA ZANJAD ... Opponents
To,
MR. DADABHAU ANANDA ZANJAD
At : P. 304, S. No. 425-427
Lake Paradise -Pune.410507

Whereas the above named applicant has filed Accident Claims Application for the compensation of Rs.100,000/- in the Tribunal against you and others.
You are hereby given notice to appear in the Tribunal in person or by pleader duly instructed and to file your say within. 30 days from the publication of this notice. Failing which the said application will be heard in your absence and determined ex-parte.
Give under my hand and seal on this day of

Sign/-
Clerk
M.A.C.T THANE

Stamp

By Order
Sign/-
Superintendent
Motor Accident Claims Tribunal
Thane

वसई-विरार पालिका क्षेत्रातील अर्नाळा बीचनजीकच्या

# अनधिकृत रिसॉर्टवर महापालिकेचा हातोडा

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निर्देशांची पालिकेकडून तातडीने अंमलबजावणी

मुंबई: वसई-विरार महानगरपालिका क्षेत्रातील अर्नाळा बीचनजीकच्या अनधिकृत रिसॉर्टवर महानगरपालिकेने हातोडा चालवला आहे. बीचच्या परिसरातील सर्व अनधिकृतपणे चालणारी रिसॉर्ट जमीनदोस्त करण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले होते. महानगरपालिकेच्या वतीने तातडीने ही तोडक कारवाई सुरू करण्यात आली आहे. शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख रघुनाथ मोरे यांचे पुत्र, उबाठा गटाचे माजी उपशहरप्रमुख आणि माजी परिवहन समिती सदस्य मिलिंद मोरे यांचे काल दुःखद निधन झाले. काल आपल्या कुटूंबासह अर्नाळा बिच येथील रिसॉर्टवर गेले असता तिथे स्थानिक नागरिकांशी झालेल्या वादातून त्यांच्यावर हल्ला करण्यात आला होता. या हल्ल्यात झालेल्या दुखापतीमुळे अचानक हृदयविकाराचा झटका येऊन त्यात त्यांचे दुःखद निधन झाले. ही बातमी ठाण्यात वाऱ्यासारखी पसरली त्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मोरे यांच्या ठाण्यातील निवासस्थानी जाऊन त्यांचे अंत्यदर्शन घेतले. यावेळी कुटूंबियाकडून झालेला प्रसंग समजल्यावर मुख्यमंत्र्यांनी या घटनेची तत्काळ दखल घेऊन या भागातील सर्व अनधिकृत रिसॉर्टसवर हातोडा चालवण्याचे निर्देश वसई-विरार महानगरपालिका आयुक्तांना दिले.






त्यानुसार या भागातील रिसॉर्टवर कारवाई सुरू झाली असून काही रिसॉर्टसचे बांधकाम पालिकेच्या वतीने जमीनदोस्त करण्यात आले आहे. या भागात अनधिकृतपणे सुरू करण्यात आलेल्या या रिसॉर्ट्सच्या विरोधात स्थानिक नागरिकानी अनेकदा पालिका प्रशासनाकडे तक्रार करून ती बंद करावीत अशी मागणी केली होती. मात्र आज अखेर मुख्यमंत्र्यांनी या रिसॉर्टच्या विरोधात कारवाई करण्याचे निर्देश दिल्यानंतर या कारवाईला गती आली आहे. सकाळपासून पलिकेने या रिसॉर्टसह अनेक अनधिकृत रिसॉर्टवर तोडक कारवाई केली असून ही कारवाई यापुढेही चालु राहणार आहे.

# दाऊदला भर चौकात फाशी द्या : प्रितम म्हात्रे

## अंमली पदार्थ विक्री करणाऱ्यांच्या मुसक्या आवळाव्या

**पनवेल : तीन दिवसांपूर्वी नवी मुंबईत उरणमध्ये यशश्री शिंदे नावाच्या वीस वर्षीय तरुणीची अत्यंत क्रूरपणे हत्या करण्यात आली होती. या घटनेनं संपूर्ण महाराष्ट्रात खळबळ उडाली. या प्रकरणातील आरोपी दाऊद शेख हा यशश्रीची हत्या करून कर्नाटकमध्ये पळून गेला होता. अखेर नवी मुंबई पोलिसांनी कर्नाटकमध्ये जाऊन आरोपीच्या मुसक्या आवळल्या आहेत. यशश्री शिंदे च्या कुटुंबीयांची आज शेतकरी कामगार पक्षाचे नेते प्रितम जनार्दन म्हात्रे यांनी भेट घेतली. त्यांचे सांत्वन करतानाच आरोपीला फक्त फाशीच नाही तर ती भर चौकात फाशी दिली गेली पाहिजे जेणेकरून भविष्यात अशा प्रकारचे कृत्य करण्यासाठी कोणी धजावणार नाही अशा प्रकारची तीव्र शब्दात भावना त्यांनी व्यक्त केली.**



नशेच्या अधीन होऊन तरुण पिढी बिघडत आहे. मानखुर्द गोवंडी येथून हे अंमली पदार्थ विक्रेते रेल्वेने येतात आजूबाजूच्या परिसरातील ठराविक चहा-पान टपऱ्या, इस्त्रीवाले, ठराविक नाके या ठिकाणी चरस गांजा तरुणांना उपलब्ध करून देतात. प्रथमतः हे अड्डे उध्वस्त केले पाहिजे. आम्ही स्वतः नवीन पनवेल, अमेटी कॉलेज, खारघर, उलवे नोड पासून सुरुवात केली आहे. नागरिकांना मी आवाहन करीन आपल्या नजरेस असे काही आढळल्यास थेट आमच्याशी संपर्क साधा आपण कायद्याच्या चौकटीत ते उध्वस्त करण्याचा पूर्ण बंदोबस्त करू जेणेकरून आपली तरूण पिढी भविष्यात व्यसनाधीन होणार नाही.

**-प्रितम जनार्दन म्हात्रे, खजिनदार,** शेतकरी कामगार पक्ष रायगड

रविवारी उरण मधील नागरिकांच्या वतीने काढण्यात आलेल्या निषेध मोर्चात ते सहभागी झाले होते. सदर गंभीर विषयात बोलताना त्यांनी सांगितले अशा प्रकारचे घटना घडण्याचे प्रकार दिवसेंदिवस वाढत चालले आहे. आजची तरुण पिढी नशेच्या अधीन झाली आहे. उरण-पनवेल परिसरात सर्रासपणे गांजा आणि इतर नशेडी पदार्थ तरुणांना सहज उपलब्ध होत आहेत. ही बाब अत्यंत गंभीर आहे. यावर लवकरच उपाययोजना सरकारने करणे अपेक्षित आहे. तर त्यांनी अशा प्रकारच्या अनेक घटना आपल्या परिसरात आत्ताही घडत असतील मी अशा सर्व तरुणी आणि त्यांच्या पालकांना आवाहन करू इच्छितो की कुठल्याही दडपणाखाली न राहता आपण ते पोलिसांशी संपर्क साधून आपल्या समस्या व्यक्त कराव्या. जेणेकरून अजून नवीन दाऊद शेख तयार होण्याच्या अगोदरच ठेचला जाईल. अशा अडचणीच्या वेळी पोलीस प्रशासना सोबतच आम्ही सर्व तुमच्या सोबत आहोत आमच्याशी कधीही संपर्क साधा. या गंभीर गुन्ह्यात पोलिसांनी कार्यतत्परता दाखवून आरोपीच्या मुस्क्या आवळल्या त्याबद्दल त्यांचेही आभार. मला न्याय व्यवस्थेवर पूर्ण विश्वास आहे त्याला फाशीच मिळेल ही आमची मुख्य मागणी पूर्ण होईल.

# कळंबोलीतील लोखंड पोलाद बाजारातील छताच्या सजावटीचा भाग कोसळला

पनवेल : कळंबोली येथील मुंबई महानगर प्रदेश लोखंड व पोलाद बाजार समितीच्या कार्यालयामध्ये छताचा भाग कोसळल्याची घटना मंगळवारी रात्री घडली. यावेळी कार्यालय बंद असल्याने कोणीही या घटनेत जखमी झाले नाही.

५४ कोटी रुपयांचा अपहार झालेल्या कळंबोली येथील लोखंड पोलाद बाजार समितीचा कारभार सध्या जोरदार चर्चेत आहे. आशियाखंडातील सर्वात मोठी लोखंड व पोलादाची बाजारपेठ कळंबोली येथे असल्याने या समितीच्या कार्यालयाचे महत्व अधिक आहे. मात्र या समितीमध्ये झालेल्या संशयास्पद कारभारामुळे समिती वादाच्या भोव-यात अडकली आहे. बाजार समितीचे कार्यालय सध्या ज्या इमारतीमध्ये आहे ती इमारत जिर्ण अवस्थेमध्ये आहे. मंगळवारी रात्री बाजार समितीचे कार्यालय असलेल्या छताला अंतर्गत केलेल्या सजावटीचा भाग कोसळला. याच इमारतीमध्ये पनवेल प्रादेशिक परिवहन विभागाचे कार्यालय आहे.

सध्या प्रादेशिक परिवहन विभागाच्या कार्यालयाला सुद्धा लोखंडी टेकू लावण्यात आले आहेत. लोखंड पोलाद बाजार समितीने २०१७ साली कार्यालयाचे सजावटीचे काम केले होते. मंगळवारी झालेल्या पडझडीनंतर या इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडीट करण्याचा निर्णय बाजार समितीने घेतल्याची माहिती बाजार समितीचे कार्यकारी अधिकारी अमिष श्रीवास्तव यांनी दिली. जीर्ण इमारत कोसळण्यापूर्वी सरकारी कार्यालये सूरक्षित ठिकाणी हलविण्याची मागणी दोन्ही सरकारी कार्यालयाकडून होत आहे. या दोन्ही सरकारी कार्यालयांचे प्रमुख जागेच्या शोधात आहेत. मात्र सरकारी भाडेदरात प्रशस्त जागा सापडत नसल्याने जीव मुठीत घेऊन सरकारी कर्मचारी व अधिकारी धोकादायक इमारतीमधून काम करत आहेत.

# माता बाल रुग्णालय लवकरच

### कोपरखैरणे नागरिकांची आरोग्य सेवेची प्रतीक्षा संपुष्टात

नवी मुंबई : वेगाने वाढणाऱ्या नवी मुंबई महापालिका क्षेत्रात उत्तम आरोग्य सेवा नागरिकांना पुरविण्यासाठी महापालिका प्रयत्नशील असते. परंतु मागील ९ वर्षांपासून कोपरखैरणे हा विभाग महापालिकेच्या आरोग्यसेवांपासून वंचित आहे. कोपरखैरणे सेक्टर २२ येथील महापालिकेचे माता बाल रुग्णालयाचे नवीन बांधकाम सुरू असून ९० टक्के काम पूर्ण झाले आहे. लवकरच याचे काम पूर्ण होणार असून नागरिकांच्या सेवेत दाखल होईल अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. कोपरखैरणे सेक्टर २२ येथे महापालिकेचे माता बाल रुग्णालय होते, परंतु ते मागील काही वर्षांपासून बंद आहे. येथील अनेक गरोदर महिलांना ७ कि.मी. अंतरावरील ऐरोली आणि ४ कि.मी. अंतरावरील वाशी महापालिका रुग्णालय गाठावे लागते. हे रुग्णालय बंद पडल्याने येथील नागरिकांना वाशी,नेरुळ, ऐरोली येथील पालिकेच्या सार्वजनिक रुग्णालयात ७ ते ८ किलोमीटरची पायपीट करून जावे लागत आहे. प्रसंगी खासगी रुग्णालयाचा आधारही घ्यावा लागत आहे.

दरम्यानच्या कालावधीत महापालिकेने त्याच विभागात दुसरी आरोग्य सुविधायुक्त तयार इमारत खरेदी करण्याचे नियोजन आखले होते,मा त्र ती इमारत अनधिकृत बांधकामाच्या कचाट्यात सापडली होती, त्यामुळे ती इमारत खरेदी करण्याचा प्रस्ताव रद्द करून पुन्हा जुन्याच इमारतीच्या जागी नवीन बांधकाम करण्याचा निर्णय घेण्यात आला. सन २०२२ पासून या इमारतीचे बांधकाम सुरू करण्यात आले आतापर्यंत ९० टक्के बांधकाम झाले आहे. अभियंता विभागाकडून हस्तांतर होताच सुरू करण्यात येईल अशी माहिती वैद्याकीय अधिकारी प्रशांत जवादे यांनी दिली आहे.

छत्रपती संभाजीनगर येथील प्रकल्पासाठी टोयोटा किर्लोस्करसमवेत सामंजस्य करार

# राज्यातील मोटार निर्मिती उद्योगात क्रांती आणणारा प्रकल्प : मुख्यमंत्री शिंदे

मुंबई : छत्रपती संभाजीनगर येथे टोयोटा किर्लोस्करच्या प्रकल्पामुळे मराठवाड्याला मोठा फायदा तर होईलच शिवाय एकूणच भारतातील मोटार वाहन निर्मिती उद्योगात देखील एक क्रांती येईल, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.

आज सह्याद्री अतिथिगृह येथे राज्य शासनाचा उद्योग विभाग आणि टोयोटा किर्लोस्कर यांच्यात छत्रपती संभाजीनगर येथील ऑरिक सिटीमध्ये इलेक्ट्रिक आणि हायब्रीड कार्स निर्मितीच्या ग्रीनफिल्ड प्रकल्पासाठी सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यात आली. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उद्योग मंत्री उदय सामंत, गृहनिर्माण मंत्री अतुल सावे, किर्लोस्कर मोटर्सच्या उपाध्यक्ष मानसी टाटा, गीतांजली किर्लोस्कर, टाटा किर्लोस्करचे व्यवस्थापकीय संचालक मसाकाझू योशीमुरा, मुख्यमंत्र्यांचे अतिरिक्त मुख्य सचिव इक्बालसिंह चहल, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव विकास खारगे, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ.श्रीकर परदेशी, उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे. एमआयडीसी सीईओ विपिन शर्मा आदी उपस्थित होते.

छत्रपती संभाजीनगर येथे या प्रकल्पातून इलेक्ट्रिक आणि हायब्रीड कारचे उत्पादन होणार आहे. यासाठी २० हजार कोटींची गुंतवणूक केली जाणार असून सुमारे ८ हजार थेट आणि अप्रत्यक्ष ८ हजार अशी १६ हजार रोजगार निर्मिती होणार आहे. या प्रकल्पातून वर्षाला ४ लाख कारची निर्मिती होणे अपेक्षित आहे. या प्रकल्पासाठी ८५० एकर जागा देण्यात आली आहे.

यावेळी या कराराचे वर्णन 'ऐतिहासिक' या शब्दात करून उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, राज्यात अनेक ऑटोमोबाईल सेक्टर आहेत पण टोयोटा नसल्याने ते अपूर्ण होते. आता राज्यात टोयोटा असल्याने हे सेक्टर पूर्ण झाले आहे. मराठवाड्यातील चेंबर ऑफ कॉमर्स समूह या उद्योगासाठी शासनाच्या वतीने सर्वोतोपरी सहकार्य करेल. या गुंतवणुकीमुळे मराठवाड्यात रोजगार निर्मिती तर होणारच आहे पण आर्थिक प्रगतीही साध्य होणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात आम्ही राज्याची अर्थव्यवस्था एक ट्रिलियन डॉलर करण्याकडे वाटचाल सुरु केली आहे. हा करार अर्थव्यवस्था वाढीचे उद्दिष्ट पूर्ण करण्यास महत्वपूर्ण ठरणार आहे. राज्यात जेएनपीटीसारखे बंदर आहे आणि त्याच्या तीनपट मोठे वाढवणं बंदर होणार आहे. हे देशातील सर्वात मोठे बंदर ठरणार आहे. तसेच जालनामध्ये ड्राय पोर्ट होणार आहे. निर्यातीसाठी उत्तम असल्याने मराठवाड्यात गुंतवणूक म्हणजे निर्यातीच्या सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत असेही उपमुख्यमंत्री म्हणाले.






रेल्वेमध्ये नोकरीचे अमिष दाखवून बेरोजगार तरुणांची फसवणूक करणाऱ्या आरोपीला ठाणे गुन्हे शाखेने केली अटक. (छाया : मनोज सिंह)

# शनिवारी ठाण्यात महाराष्ट्र म्युनिसिपल कर्मचारी युनियनचा राज्यस्तरीय मेळावा

ठाणे : विविध स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये कार्यरत असलेल्या कामगारांच्या न्याय हक्कासाठी झगडणाऱ्या महाराष्ट्र म्युनिसिपल कर्मचारी युनियनचा राज्यस्तरीय मेळावा येत्या शनिवारी (दि. ३) ठाण्यात आयोजित करण्यात आला आहे.सध्या राज्यभरातील महानगर पालिका आणि नगरपालिकांमध्ये कंत्राटी कामगारांचे जाळे पसरले आहे. त्यामुळे सफाई, आरोग्य आदी खात्यांमध्ये भरतीच करण्यात येत नाही. कंत्राटदारांकडून कामगारांची प्रचंड पिळवणूक केली जात आहे. ही पिळवणूक केवळ आर्थिक नसून मानसिक आणि शारीरिकही आहे. ही वेठबिगारी रोखून किमान वेतन आयोगाच्या निर्देशाप्रमाणे वेतन, सुविधा देण्यात याव्यात; कामगारांना सुरक्षेची साधने पुरविण्यात यावीत; कामगारांना त्यांच्या नोकरीची हमी द्यावी; चतुर्थश्रेणी सोबतच तृतीय श्रेणीतील कामगारांनाही वारसा आणि अनुकंपाचे लाभ मिळावेत, आदी मागण्यांवर साधक बाधक चर्चा या मेळाव्यात करण्यात येणार आहे. शनिवारी सकाळी ११ वाजता महात्मा फुले नगर खुले रंगमंच, खारटन रोड येथे आयोजित या मेळाव्यास राज्यभरातील कामगार उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती महाराष्ट्र म्युनिसिपल कर्मचारी युनियनचे अध्यक्ष रवींद्र शिंदे यांनी दिली.

# महिला सुरक्षा व वाहतूक सुरक्षेबाबत ठाणे पोलिसांच्यावतीने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

ठाणे : औद्योगिक प्रशिक्षण संस्था,वागळे इस्टेट, ठाणे येथे 'महिला सुरक्षा व वाहतूक सुरक्षा' या विषयावर ठाणे पोलिसांच्या वतीने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. औद्योगिक प्रशिक्षण संस्था, वागळे इस्टेट, ठाणे येथे ' महिला सुरक्षा व वाहतूक सुरक्षा' या विषयावर सहाय्यक पोलीस आयुक्त अनिल घेरडीकर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात श्रीनगर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक गुन्हे गुलझारीलाल फडतरे व पोलीस




उपनिरीक्षक रेश्मा कदम यांनी मार्गदर्शन केले.या कार्यक्रमाला सहाय्यक प्रशिक्षणार्थी सल्लागार करपे सर उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता संस्थेच्या प्राचार्या श्रीमती. स्मिता माने यांच्यासह सर्व गट निदेशक, निदेशक, कर्मचारी व प्रशिक्षणार्थी यांचे सहकार्य लाभले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एन. एस .एस. कार्यक्रमाधिकारी एम.के सरवदे यांनी केले.

# रविवारी पनवेलमध्ये जयपूर फुट शिबीर

पनवेल : श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पनवेल, भारतीय जनता पार्टी, रायगड जिल्हा मेडिकल असोसिएशन आणि साधू वासवानी मिशन पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दिनांक ०४ ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आलेल्या 'विनामूल्य आरोग्य तपासणी आणि मोफत औषधोपचार महाशिबिर'च्या अनुषंगाने 'मोफत जयपूर फूट' शिबिराचेही आयोजन करण्यात आले आहे.

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली दरवर्षीप्रमाणे यंदाही खांदा कॉलनी येथील सीकेटी महाविद्यालयाच्या प्रांगणात 'विनामूल्य आरोग्य तपासणी आणि मोफत औषधोपचार महाशिबिर' आयोजित करण्यात आले आहे. अपंगत्व आलेले किंवा अपघातात हात व पाय गमावल्यामुळे जीवनाचा प्रवास खडतर होत असतो त्यामुळे यावर योग्य उपाय म्हणून तंत्रज्ञानाद्वारे कृत्रिम अवयवची निर्मिती झाली. आणि त्या अनुषंगाने निर्माण करण्यात आलेल्या कृत्रिम हात पाय अर्थात जयपूरफुट मुळे भारतातील दिव्यांगांचे आयुष्य बदलून गेले आहे. गेल्या अनेक वर्षांपासून साधू वासवानी मिशन पुणे यांच्या सोबतीने जयपूर फुट शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे या वर्षीही जयपूर फुट शिबिर या महाशिबिरात आयोजित करण्यात आले आहे. या शिबिराचा लाभ घेण्यासाठी किंवा अधिक माहितीसाठी डॉ. अरुणकुमार भगत ९२२३५०५५५५, किंवा अनिल कोळी ९७६९४०९१६१ यांच्याशी संपर्क करावा, असे आवाहन आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांनी केले आहे.

# नमुंमपा विद्यार्थी शिष्यवृत्ती योजनेचे लाभ वितरण सुरू

नवी मुंबई : नवी मुंबई महानगरपालिकेच्या विद्यार्थ्यांना वितरित करण्यात येणा-या शिष्यवृत्ती योजनेचा लाभ त्वरित वितरित करणेबाबत महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार समाजविकास विभागाच्या वतीने लाभ वितरणास सुरूवात झालेली असून पहिल्या टप्प्यात पात्रता निश्चित झालेल्या ३१७४ विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात २ कोटी १५ लक्षाहून अधिक शिष्यवृत्ती रक्कम डिबीटीव्दारे जमा करण्यात आलेली आहे. तसेच या आठवड्यात पात्रता निश्चित केलेल्या २५ हजार ४१७ विद्यार्थ्यांच्या बॅक खात्यात रू. १९ कोटी ६७ लाखाहून अधिक रक्कम डिबीटी व्दारे जमा करण्यात येत आहे.

विद्यार्थ्यांना नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने देण्यात येणारी शिष्यवृत्ती तत्परतेने वितरित केली जावी असे निर्देश नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्यामार्फत देण्यात आले होते. शिष्यवृत्ती वितरणासाठी अर्ज तपासणी, कागदपत्रांची त्रुटी आढळणा-या अर्जदारांना कागदपत्रे जमा करण्यासाठी कालावधी देणे अशा कार्यालयीन प्रक्रियेसाठी समाजविकास विभागास कालबध्द नियोजन करून देण्यात आले होते. आयुक्त महोदयांमार्फत याचा सातत्याने आढावा घेतला जात होता. या अनुषंगाने प्रक्रियेस गती देत प्रत्यक्ष शिष्यवृत्ती वितरण करण्यास सुरूवात झालेली आहे.

सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षात शिष्यवृत्ती योजनांचा लाभ देणे करिता ०८ फेब्रुवारी २०२४ रोजी वृत्तपत्रात जाहीर आवाहन प्रसिध्द करून महानगरपालिका क्षेत्रातील विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविण्यात आले होते. याकरिता २९ फेब्रुवारी २०२४ पर्यंत मुदत देण्यात आली होती. त्यानंतर नागरिकांच्या विनंतीनुसार प्रथम १५ मार्च पर्यंत व त्यानंतर ३१ मार्च २०२४ पर्यंत अंतिम मुदतवाढ देण्यात आली.

त्यानुसार सर्व घटकांतर्गत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांकरिता एकूण ४०६३५ अर्ज ऑनलाईन पद्धतीने प्राप्त झाले होते. त्यामधून प्रथम टप्प्यात ५५९४ एवढ्या लाभार्थ्यांची पात्रता निश्चित करून लाभ देणेकरिता प्रस्ताव सादर करण्यात आले होते. तथापि, दि. १५ मार्च २०२४ रोजी लोकसभा निवडणूकीची आदर्श आचारसंहिता लागू झाल्याने तसेच त्यानंतर पदवीधर मतदार संघ निवडणूकीची आदर्श आचारसंहिता लागू झाल्याने या लाभार्थ्यांना लाभ देता आला नाही.

तथापि आयुक्त महोदयांच्या निर्देशानुसार आचारसंहिता कालावधीत याबाबतची अंतर्गत कार्यालयीन कार्यवाही करण्यात येऊन या प्रक्रियेस गती देण्यात आली. त्यास अनुसरून सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात महिला व बालकल्याण घटकांतर्गत विधवा / घटस्फोटित महिलांच्या मुलांना शिष्यवृत्ती देणे आणि आर्थिक व दुर्बल घटकातील शाळेत जाणाऱ्या मुला-मुलींना शिष्यवृत्तीचे वितरण करणे, नवी मुंबई क्षेत्रातील स्थानिक प्रकल्पग्रस्तांच्या कुटुंबातील इयत्ता १ ली ते महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या मुलांना शिष्यवृत्तीचे वितरण करणे, नवी मुंबई क्षेत्रातील महापालिका आस्थापनेवरील सफाई कामगार व कंत्राटी पध्दतीवर असलेल्या कामगारांच्या मुलांना शिष्यवृत्तीचे वितरण करणे या योजनांव्दारे १८ जुलै, २०२४ रोजी पहिल्या टप्यात एकूण ३१७४ विद्यार्थ्यांना रु. २ कोटी १५ लक्ष ४२ हजार ८०० इतकी शिष्यवृत्ती रक्कम डिबीटीव्दारे वितरीत करण्यात आलेली आहे.

त्याचप्रमाणे विविध शिष्यवृत्ती योजनेंतर्गत पात्रता निश्चित केलेल्या २५,४१७ विद्यार्थ्यांना एकूण रु. १९ कोटी ६७ लक्ष २० हजार इतकी शिष्यवृत्ती रक्कम संबंधित विद्यार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये डिबिटीव्दारे या आठवडयात जमा केली जात आहे.

नवी मुंबई महानगरपालिका समाजविकास विभागामार्फत महापालिका क्षेत्रातील महिला, मुली, निराधार, विधवा, मागासवर्गीय घटकातील युवक - युवती, महिला. पुरूष, प्रकल्पग्रस्त, सफाई कामगार, नाका कामगार, खुल्या प्रवर्गातील गरजू बेरोजगार युवक - युवती इ. विविध घटकांतर्गत विविध प्रकारच्या कल्याणकारी योजना राबविण्यात येत असून त्यासाठी पात्र असलेल्या नवी मुंबईकर नागरिकांनी त्याचा लाभ घ्यावा असे आवाहन नमुंमपा समाजविकास विभागाच्या वतीने करण्यात येत आहे.

# आंध्र प्रदेशचे नगरपालिका प्रशासन व नगर विकास मंत्री डॉ. पी. नारायण गारू यांनी सिडकोच्या विविध प्रकल्प स्थळांना दिली भेट

मुंबई : प्रकल्प स्थळांना भेट दिल्यानंतर सिडको भवन येथे आंध्र प्रदेशच्या शिष्ट मंडळातील सदस्यांकरिता सिडकोच्या प्रकल्पांचे सादरीकरण करण्यात आले. या प्रसंगी विजय सिंघल, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको, शान्तनु गोयल, सहव्यवस्थापकीय संचालक, सिडको, सुरेश मेंगडे, मुख्य दक्षता अधिकारी, सिडको, कटानेनी भास्कर, आयुक्त, एपीसीआरडीए, एम. नवीन, अतिरिक्त आयुक्त, एपीआरसीडीए, प्रवीण चंद, अतिरिक्त आयुक्त, एपीआरसीडीए, रवींद्र मानकर, मुख्य नियोजनकार, सिडको, एन. सी. बायस, मुख्य अभियंता (नवी मुंबई), सिडको, प्रभाकर फुलारी, अतिरिक्त मुख्य अभियंता, सिडको, आशितोष निखाडे, अतिरिक्त मुख्य नियोजनकार आणि श्रीमती प्रांजली माने, वरिष्ठ नियोजनकार, सिडको यांच्यासह अन्य अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



आंध्र प्रदेश शासनातर्फे आंध्र मधील अमरावीत येथील २१७ चौ.कि.मी. क्षेत्रावर राजाधीनचे शहर विकसित करणे नियोजित आहे. या प्रकल्पांतर्गत शहरांतर्गत रस्ते, पाणी पुरवठा, मलनिस्सारण व्यवस्था, दळणवळण इ. पायाभूत सुविधांसह सचिवालय, विधीमंडळ, उच्च न्यायालयाच्या इमारती विकसित करण्यात येणार आहेत. या सुविधांसह शासकीय गृहनिर्मितीही नियोजित आहे.

या संदर्भात भौतिक व सामाजिक पायाभूत सुविधांनी परिपूर्ण स्वयंपूर्ण शहरे विकसित करण्याचा दीर्घ अनुभव असणाऱ्या सिडकोच्या नगर नियोजनातील उत्कृष्ट प्रथा, पद्धती आणि आर्थिक प्रारुपांचा अभ्यास करण्याकरिता सिडकोच्या विविध विकास प्रकल्पांना भेट देण्याच्या अनुषंगाने आजच्या भेटीचे नियोजन सिडकोतर्फे करण्यात आले होते.

# पहिली ४ स्टार टेबल टेनिस रँकिंग स्पर्धा ठाण्यात संपन्न



ठाणे : श्री माँ गुरुकुल आणि ॲस्पिरेंट्स टेबल टेनिस ॲकेडमी यांच्या संयुक्त विद्यमाने ठाण्यातील घोडबंदर रोड येथील श्री माँ स्नेहदीप सभागृहात पहिल्या ४ स्टार टेबल टेनिस रँकिंग स्पर्धेचे पाच दिवस आयोजन केले गेले. या स्पर्धेत मुंबई मध्य जिल्हा आणि ठाणे जिह्यातून तब्बल ४२५ खेळाडू सहभागी झाले होते.

ठाणे जिल्हा टेबल टेनिस असोसिएशन (टीडीटीटीए) आणि मुंबई सेंट्रल डिस्ट्रिक्ट टेबल टेनिस असोसिएशन (एमसीडीटीटीए) यांनी मान्यता दिलेल्या या स्पर्धेमुळे ठाणे जिल्हा संघ आणि मुंबई सेंट्रल संघाला राज्य अजिंक्यपद २०२४-२५ मध्ये प्रतिनिधित्व करण्यासाठी निवडीचे व्यासपीठ मिळाले.

११ वर्षांखालील, १३ वर्षाखालील, १५ वर्षांखालील, १७ वर्षाखालील, १९ वर्षाखालील, पुरुष, महिला आणि मास्टर्स (३९+) अशा विविध वयोगटांमध्ये १३ स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

पारितोषिक वितरण समारंभाला यतिन टिपणीस (टीडीटीटीएचे सरचिटणीस), महेंद्र चिपळूणकर (एमसीडीटीटीए व एमएसटीटीएचे सहसचिव), मिनी नायर (श्री माँ विद्यालयाच्या प्रिंसिपल), श्रीमती रमा अनंतरमण (मुख्याध्यापिका, श्री माँ विद्यालय), श्रीमती अकिला श्रीराम (श्री माँ लिलीजचे प्रमुख) आदी मान्यवर उपस्थित होते. विजेत्यांना चषक, गुणवत्ता प्रमाणपत्र व रोख पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. या स्पर्धेत १७ वर्षांखालील मुलींच्या गटात हृतिका मधुरने अन्वी गुप्तेवर तर १७ वर्षांखालील मुलांच्या गटात प्रतीक तुळसाणीने निलय पाटेकरवर विजय मिळवला. १९ वर्षांखालील मुलींच्या गटाचे विजेतेपद अन्वी गुप्तेने पटकावले, तर १९ वर्षाखालील मुलांचे विजेतेपद पार्थ मगरने पटकावले.

या संपूर्ण कार्यक्रमाचे युट्यूबवर थेट प्रक्षेपण करण्यात आले, ज्यामुळे टेबल टेनिसप्रेमींना घरबसल्या स्पर्धा पाहता आली. पहिल्या ४ स्टार टेबल टेनिस स्पर्धेने आपल्या घवघवीत यशासह भविष्यातील स्पर्धांसाठी एक यशस्वी पायंडा पाडला.

# नायगाव बापाणेमध्ये रिक्षा बंद आंदोलन

वसई : नायगाव बापाणे मुख्य रस्त्यावर विविध ठिकाणी मोठं मोठे खड्डे पडले आहेत. यामुळे रस्त्याची फारच बिकट अवस्था झाली आहे. संतप्त झालेल्या नायगाव पूर्वेच्या रिक्षाचालकांनी मंगळवारी सकाळपासूनच रिक्षा बंद आंदोलन केले. सकाळी कामावर निघालेल्या नागरिकांचे रिक्षा अभावी हाल झाले.नायगाव पूर्वेच्या भागातून नायगाव बापाणे असा महामार्गाला जोडणारा ५.२ किलोमीटर लांबीचा मुख्य रस्ता गेला आहे. या रस्त्यावरून दररोज हजारो वाहनांची वर्दळ असते.परंतु या रस्त्याची देखभाल दुरुस्ती योग्य रित्या केली जात नसल्याने रस्त्यावर मोठं मोठे खड्डे तयार झाले आहेत. या खड्डयातून प्रवास करताना रिक्षाचालक यांच्यासह वाहनचालकांना धोकादायक प्रवास करावा लागत आहे. या भागात ७५० स्थानिक रिक्षा चालकांच्या रिक्षा असून पहाटे तीन वाजल्यापासून ते रात्री अडीच वाजेपर्यंत प्रवाशांना सेवा दिली जाते. मात्र खड्ड्यांमुळे रिक्षा चालविताना मोठ्या अडचणी निर्माण झाल्या होत्या याशिवाय अपघाताच्या घटना वाहनांचे नुकसान होत आहे. वारंवार तक्रारी करून महापालिका व सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत दुरुस्ती केली जात नसल्याने संतप्त झालेल्या रिक्षाचालक मालक संघटनेने मंगळवारी पहाटे तीन वाजल्यापासूनच रिक्षा बंद आंदोलन केले. त्यानंतर दहा वाजता जूचंद्र येथील नाक्यावर रिक्षाचालक, ग्रामस्थ विविध राजकीय पक्षांच्या पदाधिकारी यांनी रास्ता रोको आंदोलन केले. दोन तास आंदोलकांनी रस्ता रोखून धरला होता. जो पर्यंत रस्त्याचे नूतनीकरण होत नाही तोपर्यंत आंदोलन मागे घेतले जाणार असा पवित्रा येथील आंदोलकांनी घेतला होता.

क्लस्टर योजनेसाठी पालिकेची

# जमीन गहाण; प्रकल्पासाठी महाप्रीत घेणार कर्ज

**ना हरकत दाखला देण्यास प्रशासकीय मान्यता पण, अंतिम मंजुरीसाठी प्रस्ताव शासनाकडे पाठविणार**

ठाणे (गणेश भोईटे) : ठाणे महापालिका क्षेत्रात सिडको पाठोपाठ महाप्रीत संस्थेकडून समुह पुनर्विकास योजनेतर्गंत किसननगर भागात इमारती उभारण्याची काम करण्यात येणार आहे. या प्रकल्पासाठी महात्मा फुले नविनीकरणीय ऊर्जा व पायाभूत प्राद्योगिकी मर्यादित (महाप्रीत) या शासकीय कंपनीला २,५४६ कोटीचे कर्ज घेण्याकरिता पालिकेची जमीन आणि भविष्यात त्यावर निर्माण होणारी वास्तु गहाण ठेवावी लागणार आहे. यासाठी ना हरकत दाखला देण्यासंबंधीचा प्रस्ताव शासन मान्यतेसाठी पाठविण्यास पालिकेच्या प्रशासकीय सर्वसाधारण सभेने मान्यता दिली आहे. यावर शासन काय निर्णय घेणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### ५० टक्के जमीन ठाणे महापालिकेच्या नावे करण्यास मंजुरी

समुह पुनर्विकास योजनेसाठी ठाणे येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या रेखांकनातील भुखंड क्रमाक एफ-१ व सी-२९ या भुखंडाच्या एकूण जमीनीपैकी ५० टक्के जमीन म्हणजेच २२,३१७.६० चौ.मी इतके क्षेत्र त्रिपक्षीय करारनामान्वये ठाणे महापालिकेच्या नावे करण्याचे निश्चित झाले आहे. त्यानुसार शासनाच्या कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास आणि मत्स्य व्यवसाय विभागाच्या शासन निर्णयानुसार कृषी विभागाची १.९३२ हेक्टर इतकी जमीन ठाणे महापालिकेच्या नावे करण्यास मंजुरी देण्यात आली असून ही जमीन पालिकेच्या नावे झाली आहे.

### मालमत्ता महाप्रीत कंपनी एचयुडीसीको कडे गहाण ठेवणार

किसननगर येथील नागरी पुनरुत्थान आराखडा क्रमांक १२ अतंर्गत येणाऱ्या युआरसी क्रमांक पाच आणि सहा मधील महापालिकेच्या मालकीची १९,३२० चौ.मी आणि २२,३१७ चौ.मी अशी एकूण ४१,६३७.६० चौ.मी इतकी जमीन आणि त्यासह या जमिनीवर भविष्यात बांधिव स्वरुपात निर्माण होणारी मालमत्ता महाप्रीत कंपनी एचयुडीसीको कडे गहाण ठेवणार आहे, असे पालिकेने प्रस्तावात म्हटले आहे.

ठाणे शहरात मोडकळीस आलेल्या धोकादायक इमारती पावसाळ्यात कोसळून जीवितहानी होते. अशा घटना टाळण्यासाठी अनधिकृत आणि अधिकृत इमारतींचा सुनियोजित तसेच संपूर्ण नागरी पायाभूत सुविधांसह पुनर्विकास करण्यासाठी क्लस्टर योजना राबविण्यात येत आहे. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा हा महत्वकांक्षी प्रकल्प आहे. या प्रकल्पासाठी ४५ नागरी पुनरुत्थान आराखडे ठाणे महापालिकेने तयार केले होते. पहिल्या टप्प्यात किसननगर भागात सिडकोच्या माध्यमातून हा प्रकल्प राबविण्यात येत असून याठिकाणी प्रकल्पाच्या प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून नागरिकांना हक्काची आणि मालकी घरे मिळणार आहे. त्याचबरोबर महाप्रीत या शासकीय कंपनीच्या माध्यमातून ठाणे शहरातील टेकडी बंगला, हजुरी आणि किसननगरमधील उर्वरित भागात समुह विकास प्रकल्प राबविण्यात येणार असून त्यासाठी महाप्रीतने ठाणे महापालिकेबरोबर सामंजस्य करार केला आहे. किसननगर येथील नागरी पुनरुत्थान आराखडा क्रमांक १२ अतंर्गत येणाऱ्या युआरसी क्रमांक पाच आणि सहा येथे समुह योजनेच्या अंमलबजावणीचे काम महाप्रीत कंपनी करणार आहे. या प्रकल्पासाठी महाप्रीत एचयुडीसीको कडून २,५४६ कोटी रुपयांचे कर्ज घेणार असून त्यासाठी महाप्रीत पालिकेची जमीन गहाण ठेवणार आहे. तसा प्रस्ताव महाप्रीतने पालिका प्रशासनाला दिला होता. परंतु महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७९(सी) अंतर्गत महापालिका स्तरावर किंवा आयुक्तांच्या स्तरावर गहाण ठेवणे विषयी कोणतीही स्पष्ट तरतुद नाही. महाराष्ट्र अधिनियमातील कलम ७९ (सी) व ७९ (जी) (३) नुसार सर्वसाधारण सभेची पुर्वमान्यता घेऊन ठाणे महापालिकेची जमीन व भविष्यात त्यावर निर्माण होणारी वास्तु गहाण ठेवण्यासाठी शासनाची पुर्वमान्यता घेण्यास आयुक्तांनी मान्यता दिली असून या प्रस्ताव प्रशासकीय सभेनेही नुकतीच मान्यता दिल्याने तो आता शासनाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात येणार आहे.

# नवी मुंबईच्या वृक्ष संरक्षण व संवर्धनासाठी नमुंमपा आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली वृक्ष प्राधिकरण दक्ष

नवी मुंबई : नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त तथा वृक्ष प्राधिकरण अध्यक्ष डॉ. कैलास शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या वृक्ष प्राधिकरणाच्या बैठकीत नवी मुंबई शहरातील वृक्ष संरक्षण आणि संवर्धन विषयी अनेक महत्वाच्या विषयांवर सांगोपांग चर्चा होऊन महत्वाचे निर्णय घेण्यात आले.

या बैठकीत नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील वृक्षगणना अहवाल सादर करण्यात आला. त्यानुसार नवी मुंबई शहरात १५ लक्ष २८ हजार ७७९ इतकी वृक्षसंपदा असून त्यामध्ये ११ लक्ष ४३ हजार ९३७ इतकी देशी प्रजातीची झाडे आहेत व ३ लक्ष ८४ हजार ८४२ बिगर देशी प्रजातीची झाडे आहेत. त्यापैकी १,६३८ हेरिटेज वृक्ष अस्तित्वात आहेत.

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील १११ प्रभागांचा विचार करता घणसोली वॉर्डमध्ये सर्वाधिक वृक्षघनता असल्याचे आढळून आले आहे. तसेच तुर्भे वॉर्डमध्ये सर्वात कमी वृक्षघनता असल्याचे निदर्शनास आले आहे. त्या अनुषंगाने चर्चेअंती आयुक्तांनी प्रत्येक वॉर्डामध्ये मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण हाती घेऊन वृक्षघनता वाढविण्याचे निर्देश दिले आहेत.

या बैठकीमध्ये यंदाच्या पावसाळी कालावधीत पाऊस आणि जोरदारे वारे यामुळे उन्मळून पडलेल्या २०५ झाडांचा अहवाल सादर करण्यात आला. त्या अनुषंगाने कोणती झाडे उन्मळून पडली यावर विस्तृत चर्चा करण्यात आली. चर्चेअंती मोठ्या प्रमाणात उन्मळून पडलेल्या झाडांची लागवड करू नये असे सर्वानुमते निश्चित करण्यात आले व आयुक्त महोदयांनी तसा निर्णय घेतला. त्यानुसार सुबाभूळ, गुलमोहर, रेन ट्री, ओकेसिया, विलायती चिंच, निलगिरी इत्यादी झाडांची लागवड न करण्याचे ठरविण्यात आले. तसेच पिंपळ, पेल्ट्रोफोरम, अशोका, आंबा, जांभूळ, भेंडी, सुरू, कांचन, कडुलिंब, सायकस, वड, करंज, उंबर, बदाम अशा पावसाळ्यात कमी नुकसान झालेल्या झाडांची वृक्ष लागवड करण्याचे सूचित करण्यात आले.







'महाराष्ट्र सम्राट' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर - डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई - ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम - ४००६०१ (महाराष्ट्र ) येथे प्रकाशित केले. संपादक - चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +९१-९१६७९५७७७१